# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०७/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## गावठी मोहाफुल दारू व देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपींवर कायदेशीर कारवाई

दिनांक ०४/०७/२०२४ रोजी पोस्टे खापा येथील स्टाफ यांना मुखबिरव्दारे मिळालेल्या माहिती वरून गुमगाव माईन नवीन वस्ती खापा येथे गावठी हात भट्टीचे दारूची विक्री होत आहे अशा माहितीवरून स्टाफ यांनी रेड कारवाई केली असता एकुण ०१ महिला आरोपी व ०२ पुरूष आरोपी नामे—१) धनरोज मुलचंद धानोरे वय ४२ वर्ष रा नवीन वस्ती खापा ता सावनेर जि नागपुर यांचे घराची घरझडती घेतली असता आरोपींच्या ताब्यातून एका पांढ—या रंगाच्या डबकीमध्ये ६० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ३०००/— रूपयाचा माल जप्त नष्ट करण्यात आला. वरील सर्व आरोपींवर मदाका कलम ६५ (e) अन्वये कार्यवाही करण्यात आली. तसेच आरोपी २) पुरूषोत्तम गीरीधर बोरकर वय ४८ वर्ष रा हींगणा ता सावनेर जि नागपुर याचे घराची घरझडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून देशी दारू संत्रा भिंगरी नं १ च्या ९० मी ली क्षमतेच्या एकुन १०० सिलंबद बाटल प्रत्येकी ३५ रु प्रमाणे असा एकुण ३५०० रु चा माल जप्त करण्यात आला.

पोस्टे केळवद अंतर्गत बाजार चौक येथे मिळालेल्या गोपनीय माहिती द्वारे आरोपी नाव पवन ईश्वर पाटिल वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र ०३ केळवद त. सावनेर हा नमुद घटनास्थळी उभा राहुन दारूची अवैधरीत्या देशी दारूची विक्री करताना मिळुन आल्याने स्टाफ यांनी आरोपीचे ताब्यातून देशी दारू संत्रा भिंगरी नं ०१ च्या ११ निपा १८० एम. एल प्रत्येकी कि.७०/— रु एकूण किमती—७७०/— चा माल जप्त करण्यात आला.

तसेच मौजा तिडंगी येथे आरोपी नाव अनिल श्यामराव भुतमारे वय ५० वर्ष रा. तिडंगी याची घरझडती घेतली असता दारूची अवैधरीत्या देशी दारूची विक्री करताना मिळुन आल्याने स्टाफ यांनी आरोपीचे ताब्यातून देशी दारू संत्रा भिंगरी नं ०१ च्या १० निपा १८० एम.एल प्रत्येकी कि.७०/— रू एकूण किमती —७०० /— चा माल एकुण १८०० एम.एल.चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर